सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ५० वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ बुधवार दि. १२ मार्च २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## बलुचिस्तान ट्रेन अपहरणामागे भारताचा हात; शाहबाज सरकारचा मोठा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२बलुचिस्तान**

बलुचिस्तानमध्ये ५०० हून अधिक प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या ट्रेनचे बलुच बंडखोरांनी अपहरण केल. या दहशतवादी हल्ल्याबाबत, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे सल्लागार राणा सनाउल्लाह यांनी थेट भारतावर रेल्वे अपहरणाचा गंभीर आरोप केला आहे.




यापूर्वी बलुच बंडखोरांनी नागरिक, महिला आणि मुलांना सोडलं होतं, तर पाकिस्तानी लष्कराचे कर्मचारी, गुप्तचर संस्थेचे अधिकारी आणि सरकारी कर्मचाऱ्यांना ओलीस ठेवलं होतं. एका वृत्तसंस्थेनुसार, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे आणि ट्रेन रुळावरून घसरली आहे. बलुच बंडखोरांनी २१४ प्रवाशांना ओलीस ठेवल्याचा दावाही केला आहे. त्यातील १०४ ओलीसांची सुटका करण्यात पाकिस्तनाच्या लष्कराला यास मिळाले आहे.

पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे सल्लागार राणा सनाउल्लाह यांनी बलुचिस्तान ट्रेन अपहरण घटनेबाबत भारतावर निराधार आरोप केले आहेत. हा तोच पाकिस्तान आहे, ज्याने दशकांपासून दहशतवाद्यांना प्रोत्साहन दिले, दहशतवादी संघटनांना आश्रय दिला आणि जिहादचे विष पसरवले, पण आता कोणत्याही पुराव्याशिवाय भारतावर आरोप करत आहे.

राणा सनाउल्लाह एका वृत्तसंस्थेशी बोलताना ते म्हणाले, 'या हल्ल्यामागे भारताचा हात आहे. भारत हे हल्ले अफगाणिस्तानच्या आतून करत आहे असंही ते म्हणाले आहेत. जेव्हा त्यांना विचारले की तेहरीक–ए–तालिबान पाकिस्तान (टीटीपी) आणि बलुच बंडखोरांमध्ये काही संबंध आहे का? टीटीपी बलुचांना पाठिंबा देते का? तर याला उत्तर देताना राणा सनाउल्ला म्हणाले, भारत हे सर्व करत आहे, यात काही शंका नाही. यानंतर, बलुच बंडखोरांना अफगाणिस्तानात सुरक्षित आश्रय मिळतो. असंही त्यांनी म्हटलं आहे.राणा सनाउल्लाह पुढे म्हणाले, अफगाणिस्तानात बसून ते सर्व प्रकारचे कट रचतात. पाकिस्तानचे शत्रू सक्रिय आहेत आणि आता त्याबद्दल दुसरे मत नाही. हा राजकीय मुद्दा नाही किंवा कोणत्याही अजेंड्याचा भाग नाही, तर एक कट आहे. भारतावर गंभीर आरोप करत ते म्हणाले, हो, भारत तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) आणि बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) दोघांनाही पाठिंबा देत आहे.

## गुंड खोक्या भोसले याला बीड पोलिसांनी उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथून ठोकल्या बेड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ प्रयागराज**

सुरेश धसांचा कार्यकर्ता, गुंड खोक्या भोसले याला बीड पोलिसांनी उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथून बेड्या ठोकल्या. आठ दिवसांपासून बीड पोलिस खोक्याच्या मागावर होते, पण तो गुंगारा देत होते. अखेर पोलिसांनी त्याचं लोकेशन स्ट्रेस केलं अन् बेड्या ठोकल्या. खोक्या भोसले याला अटक केल्यानंतरचा पहिला फोटो समोर आला आहे. फोटोमध्ये खोक्या भोसले शांत उभा असल्याचे दिसतेय.



आठवडाभरापासून खोक्या पोलिसांना गुंगारा देत होता. त्याला प्रयागराज येथेल विमानतळावरून आज अटक करण्यात आली.

बीड पोलीस आणि उत्तर प्रदेश पोलिसांनी खोक्याला सापळा रचून अटक केली. त्याला आज किंवा उद्या बीडमध्ये आणले जाणार आहे, अशी माहिती बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली. खोक्या हा आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता आहे.

खोक्या भोसले याच्यावर मागील १० दिवसांत तीन गुन्हे दाखल झाले आहेत. गुन्हे दाखल झाल्यापासून खोक्या भोसले फरार आहे. पोलिसांकडून त्याचा सातत्याने शोध घेतला जात होता. खोक्याचे शेवटचं लोकेशन प्रयागराज असल्याचे आढळले. बीड पोलिसांनी त्याला विमानतळावरून बेड्या ठोकल्या. बीड पोलिसांनी प्रयागराज येथील पोलिसांसोबत समन्वय साधत गुंगारा देण्याच्या तयारीत असणाऱ्या खोक्याला बेड्या ठोकल्या.

खोक्याला बुधवारी बीडमध्ये आणले जाणार आहे. दुसऱ्या राज्यात त्याला अटक केली आहे, त्यामुळे त्याला ट्रांझिट रिमांडवर घ्यावे लागणार आहे. स्थानिक न्यायालयाची आणि पोलिसांची परवानगी घेऊन ही प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली.

## सुरेश धस काही संबंध नसताना सतत माझा उल्लेख करतात, त्यांना समज द्यावी: पंकजा मुंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

ते माझे नाव घेऊन जी चर्चा करत आहेत, त्यावर मी माझ्या पक्षातील श्रेष्ठींशी म्हणजे मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा केली. ज्या विषयाशी कुठलाही संबंध नसताना माझ्या नावाचा उल्लेख करणे, टिप्पणी करणे त्यांच्याकडून अपेक्षित नाही. पक्षाच्या भूमिकेला ठेच पोहोचू नये, म्हणून मी चार–पाच महिने गप्प बसले, पण आता पक्षश्रेष्ठींना विनंती केली आहे की, त्यांना समज द्यावी, असे सांगत पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्याबद्दलची नाराजी उघडपणे बोलून दाखवली.




विधान भवनात पत्रकारांशी बोलताना पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्यावर पलटवार करत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. सुरेश धस यांनी पक्षविरोधी काम केल्याचा आरोप पंकजा मुंडे यांच्यावर केला होता. या आरोपाला उत्तर देताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, नागपूर अधिवेशनापासून गप्प बसले. पण आता मी पक्षश्रेष्ठींकडे सुरेश धस यांना समज देण्याची विनंती केली आहे. मी प्रचार केलाय की नाही तुम्ही रेकॉर्डवर जाऊन पाहा. या राज्यात अनेक लोक भाजपशी निगडीत होते, ते अपक्ष उभे राहिले. मंचावर जाऊन मतदानाची मी विनंती केलेली आहे. त्यांनी केलेला आरोप चुकीचा आहे. त्यांनी असा आरोप करायला नको होता, असे पंकजा मुंडे यांनी नमूद केले.

प्रचार करताना त्यांनी माझ्याशिवाय दुसऱ्या कुठल्या नेत्याचे नाव घेतले नाही. त्यामुळे निकाल लागल्यावर असे आरोप करणे, चुकीचे आहे. जो व्यक्ती ७५ हजार मतांनी निवडून आला आहे, काम केले नाही, तर कसे शक्य होईल याचे त्यांनी आत्मपरिक्षण करावे, असे पंकजा मुंडे यांनी सांगितले. तसेच लोकसभेला जे माझे लीड होते, ते अर्ध्यापेक्षा कमी झाले, मग त्यांनी माझे काम केले नाही असे म्हणायच का? त्यांनी जाहीरपणे असे बोलणे हे पक्षश्रेष्ठींना, पक्ष शिस्तीला मान्य नाही. निवडून आल्यावर माझ्याविषयी बोलले. विधानसभेचा निकाल लागला तेव्हापासून आजपर्यंत बोलण्याच टाळले. पक्षश्रेष्ठींना विनंती केली आहे की, त्यांना समज द्यावी हे खरे आहे, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

## कृष्णा आंधळे नाशिकमध्येच? बाईकवर दिसल्याचा दावा, पोलिसांकडून शोध सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नाशिक**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्या प्रकरणाला तीन महिने उलटून गेल्यानंतरही अद्याप या गुन्ह्यातील कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे. कृष्णा आंधळेच्या हत्येची शक्यता वर्तवली जात असताना आता नवी माहिती समोर आली आहे. आरोपी आंधळे हा आपल्या



एका मित्रासह आज सकाळी नाशिकमध्ये बाईकवरून फिरत असल्याचा दावा करण्यात आला असून पोलिसांकडे याबाबतची तक्रार करण्यात आली आहे. या दाव्याची दखल घेत पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी ९ वाजून ३६ मिनिटांच्या सुमारास नाशिक शहरातील गंगापूर रोडवरील सहदेव नगर येथील दत्त मंदिराजवळ कृष्णा आंधळेसारखा दिसणारा एक तरुण आपल्या मित्रासह बाईकवरून फिरत असल्याची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले असून सीसीटीव्हीमध्येही दोन संशयित तरुण फिरताना दिसत आहेत. पोलिसांकडून आता या तरुणांचा शोध सुरू करण्यात आल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.दरम्यान, सीसीटीव्हीमध्ये बाईकचा नंबर दिसत नसला तरी प्रत्यक्षदर्शींकडून करण्यात आलेल्या वर्णनानुसार आम्ही सदर संशयितांचा शोध घेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## माझी गॅरंटी घेवू नका, माझं काही खरं नाही; जयंत पाटलांना नेमकं म्हणायचं काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

माझी गॅरंटी घेवू नका, माझं काही खरं नाही, असं खळबळजनक विधान राष्ट्रवादी शरद पवारगटाचे नेते जयंत पवार यांनी केलंय. गेल्या काही दिवसांपासून जयंत पाटलांच्या पक्षांतराची चर्चा सुरू आहे. त्यात आता जयंत पाटलांचं हे विधान अतिशय महत्वाचं मानलं जातंय. आझाद मैदानात शक्तिपीठ महामार्गाविरोधातील आंदोलनात ते सहभागी सुद्धा झालेत.

राजीव शेट्टींनी एखादा झेंडा हातात घेतला की, तो सोडलेला नाही. त्यामुळे राजीव शेट्टींच्या नेतृत्वाखाली, असं बोलत असताना जयंत पाटील म्हणाले की, माझी काही गॅरंटी घेवू नका. कारण माझं काही खरं नाही, तुमच्या मनात माझ्याबद्दल शंका आहेत. तर सांगायचा मुद्दा काय की, ते जर आज खासदार राहिले असते तर लोकसभेत भाषण करता आलं असतं. ते झाले असते खासदार, पण ते आमचा सल्लाच ऐकत नाही, असं देखील जयंत पाटील यांनी म्हटलंय.



आता जयंत पाटील यांच्या या विधानाने आता सगळ्यांच्या नजरा उंचावल्या आहेत. जयंत पाटील शरद पवारांना रामराम ठोकणार का, याकडे देखील सगळ्यांच्या नजरा लागलेल्या आहेत. काही दिवसांपासून जयंत पाटील हे पक्षामध्ये नाराज असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यानंतर आज जयंत पाटलांनी केलेलं विधान देखील राजकीय वर्तुळात मोठा चर्चेचा विषय ठरलेलं आहे.

## सोळंकेंच्या विधानाने अजित पवारांची डोकेदुखी वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवारांची डोकेदुखी वाढली आहे. आता त्यांच्या आमदाराने स्वतःला उघड केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान त्यांच्याच पक्षाचे नेते आणि आमदार उभे करत आहे. मंत्री धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्यामुळे सुरू असलेला महिनाभराचा गोंधळ अजून पूर्णपणे शांत झालेला नाही आणि त्याच दरम्यान, पक्षाच्या एका आमदाराने अजित पवार यांच्या डोकेदुखीत भर घातली आहे.



अजितचे राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके यांनी जाहीरपणे सांगितले आहे की त्यांनी १० ते १२ कोटी रुपये खर्च करून निवडणूक जिंकली. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या एका व्हिडिओमध्ये अजितचे राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, आजकाल कोणीही पैशाच्या बळावर येऊन निवडणूक लढवू शकते. सोळंके म्हणतात, मी ऐकले आहे की माजलगावमधील एका उमेदवाराने निवडणुकीत सुमारे ४५ कोटी रुपये खर्च केले. तर दुसऱ्या उमेदवारानेही सुमारे ३५ कोटी रुपये वाया घालवले हे सांगत असताना आमदार सोळंके हे आठवण करून द्यायला विसरले नाहीत की वरील गोष्टी लोक बोलत आहे, पण राजकारणात सामान्यांसाठी केलेले काम जास्त महत्त्वाचे असल्याने मी स्वतः १० ते १२ कोटी खर्च करून निवडणूक जिंकलो, असे सांगून त्यांनी स्वतःला आणखी उघड केले.

या विधानानंतर आमदार सोळंके यांचे सदस्यत्व धोक्यात आल्याचे दिसून येत आहे. कारण निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांसाठी निवडणूक खर्चाची मर्यादा ४० लाख रुपये निश्चित केली आहे. लोकसभा निवडणुकीत ही मर्यादा ७५ लाख रुपये आहे. अशा परिस्थितीत आचारसंहितेचे उल्लंघन केल्याच्या आरोपांमुळे आमदार सोळंके यांना त्यांचे सदस्यत्व गमवावे लागू शकते.तसेच जेव्हा विरोधकांनी त्यांना घेरले तेव्हा सोलंके यांनी असे म्हटले की त्यांनी ते विनोदाने म्हटले आहे. त्यांनी असेही म्हटले की मी फक्त १० ते १२ लाख खर्च केले आहे, विधानादरम्यान त्यांनी चुकून कोटी सांगितले.

## लाडक्या बहिणींच्या २१०० वरून राडा; रक्कम कधी देणार विचारताच तटकरेंचं फडणवीसांकडे बोट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

राज्यात आज महायुती सरकारचा अर्थसंकल्प सादर झालाय. अजित पवार यांनी कृषी, उद्योग क्षेत्रासाठी विविध घोषणा केल्या. परंतु मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा हप्ता कधी वाढणार, यासंदर्भात कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे विरोधकांकडून सरकारवर टीका करण्यात येत आहे. आज देखील यावरून विधानपरिषदेमध्ये गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. रोहित पवारांनी जेव्हा




लाडक्या बहिणींना दिले जाणारे पैसे तसेच लाडक्या बहिणींचे फॉर्म भरणाऱ्या अंगणवाडी सेविकांना मानधनावरून महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांना प्रश्न केला. तेव्हा त्यांनी थेट फडणवीसांकडे बोट केलं.

यावेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की, लाडक्या बहिणींचे फॉर्म भरणाऱ्या अंगणवाडी सेविकांचा वेळ आणि कष्ट वापरले गेले. त्यांना प्रोत्साहनपर पैसे देण्यात येणार होते. मात्र अद्याप ते देण्यात आलेले नाही. तसेच ते त्यांना ५० रू प्रत्येकी फॉर्म देण्यात येणार होते मात्र ते आता ज्या लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत. त्यांच्या फॉर्मचे पैसे अंगणवाडी सेविकांना दिले जाणार नाही. मात्र या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. असं म्हणत रोहित पवारांनी महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांना प्रश्न केला. तेव्हा त्यांनी थेट फडणवीसांकडे बोट केलं.

तटकरे म्हणाल्या की, आम्ही ही योजना जाहीर केली. त्यावेळी लाडक्या बहिणींचे फॉर्म भरणाऱ्या अंगणवाडी सेविकांना मानधन मंजूर केले होते. मात्र ते पात्र लाभार्थ्यांच्या फॉर्मचे पैसे मिळणार आहे. तसेच यावेळी येजनेतून नावं वगळण्यात आलेल्या महिलांबाबत स्पष्टीकरण देताना अदिती तटकरे म्हणाल्या की, ज्या महिलांना इतर योजनांमध्ये १५०० पेक्षा कमी लाभ मिळतो. त्यांना उर्वरित पैसे हे लाडकी बहिण योजनेतून दिले जात आहेत. २० ते २५ लाख महिलांचा नावं वगळल्याचा आकडा चुकीचा आहे. अशी माहिती त्यांनी दिली.

## न्यायालयातील पहिल्या सुनावणीस वाल्मीक कराड हात जोडून उभा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२बीड**

राज्यभर गाजलेल्या मस्साजोग ( ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची पहिली सुनावणी केज येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या मकोका अतिजलद न्यायालयात बुधवारी सकाळी झाली. सुरक्षेच्या करणास्तव व्हिडिओ कॉन्फर्सिंगद्वारे आरोपींना न्यायालयासमोर ओळख परेडसाठी हजर करण्यात आले. यावेळी आरोपींच्या वकिलांनी जबाबचे पूर्ण कागदपत्रे मिळाले नाहीत, ते देण्यात यावे अशी मागणी केली. यानंतर आता या प्रकरणाची पुढील सुनावणी दि. २६ मार्च रोजी होणार असल्याचा निर्णय न्यायाधीश सुधीर भाजीपाले यांनी दिला.



या प्रकारणातील सर्वं आरोपीना ओळख परेडसाठी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे न्यायाल्यासमोर हजर करण्यात आले. यावेळी या प्रकरणातील मुख्यसूत्रधार वाल्मिक कराड हा हात जोडून उभा असल्याचे दिसून आले. दरम्यान, सरपंच हत्या प्रकरणातील फिर्यादी शिवराज देशमुख यांना यावेळी न्यायालयाने तुम्हाला दोषारोप पत्राची प्रत मिळाली आहे का? दाखल केलेल्या दोषारोप पत्रावर तुम्ही समाधानी आहात का? असे विचारले असता देशमुख यांनी सकारात्मक उत्तरे दिली. बुधवारी सकाळी ११:३० वाजता या प्रकरणाशी संबंधित सरपंच हत्या, खंडणी व ॲट्रॉसिटी या तीनही गुन्ह्यांच्या पहिल्या सुनावणीला सुरुवात झाली. प्रथमत: सर्व आरोपींना व्हिडिओ कॉन्फर्सिंगद्वारे न्यायालयासमोर हजर करुन ओळख परेड घेण्यात आली.

## संपादकीय ......

# ‘फळांचा राजा’ वातावरणाच्या विळख्यात

अवकाळी पाऊस, तापमानातील चढउतार, अधूनमधून वेगाने वाहणार्या वार्यामुळे यंदा हापूस आंब्याचा मोहोर गळण्याचे प्रमाण वाढले. परिणामी, यंदाच्या हंगामात आंबा कमी प्रमाणात उपलब्ध होणार आहे. ‘फळांचा राजा’ हापूस आंब्याला कोकणातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात मोठी मागणी आहे. यंदा हापूस आंब्याची आवक घटणार आहेच, तसेच स्थानिक बाजारपेठेतही आंबा उशिरा दाखल होणार आहे.

आंबा पीकवाढीच्या काळात किमान तापमान किमान २२ ते २५ अंश सेल्सिअस इतके असते, तर कमाल ३० ते ३२ अंश सेल्सिअस असते. यावर्षी नोव्हेंबरपर्यंत पाऊस झाल्याने बागायतदार चांगलेच अडचणीत सापडले आहेत. दरवर्षी ऑक्टोबरपासून फवारणी करावी लागते; मात्र यंदा पावसाळा लांबल्याने तसेच अवकाळीमुळे नोव्हेंबरनंतर फवारणीला सुरुवात झाली. अवकाळी पाऊस, तापमानातील चढउतारामुळे यंदा हापूस आंबा बाजारपेठेत उशिरा दाखल होणार आहे. नैसर्गिक संकटांचा सामना शेतकरी, बागायतदारांना नेहमीच करावा लागतो. यंदा मात्र आंबा आणि काजू पिकावर मोठे नैसर्गिक संकट कोसळले आहे. मार्चमध्ये स्थानिक बाजारपेठेत हापूस आंबा दाखल होतो; मात्र अद्यापही मोठ्या प्रमाणात हापूस दाखल झालेला नाही. अवेळी पडणार्या पावसामुळे तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. मार्च महिन्यातच तापमान अगदी ३७ ते ३८ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. यामुळे बर्याच ठिकाणी फळगळतीही झाली आहे. जानेवारीच्या सुरुवातीला मोहरसुद्धा मोठ्या प्रमाणात गळला होता. पावसामुळे फवारणी करण्यास उशीर झाल्याने आंबा पीक येण्यास अनियमितता आली आहे.

हापूस आंबा झाडांची योग्य काळजी घेताना खत घालणे, साफसफाई करणे आदी मोठे कष्ट करावे लागतात; मात्र यात आंबा पिकासाठी हवामान सर्वात महत्त्वाचा घटक आहे. आंब्याला पोषक हवामानाची गरज असते. यावर्षी तापमान चांगले वाढल्याने याचा फटका फळांना बसला. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांमध्ये फळगळती झाली. काही मोजक्याच बागायतदारांकडून काही पेट्या वाशी मार्केट आणि परदेशात पाठवण्यात आल्या आहेत; मात्र खर्याअर्थाने अद्यापही वाशी अथवा कोणत्याही जिल्ह्यातील हापूस आंब्याचे मार्केट गजबजले नाही. मार्चच्या अखेरपासून आंबा स्थानिक बाजारपेठेत दाखल होण्यास सुरुवात होईल. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. याचे मुख्य कारण जंगलतोड, झाडांची कत्तल आहे. आपण एकीकडे देशातील दळणवळणाची व्यवस्था भक्कम करताना दुसरीकडे पर्यावरणाचा र्हासही होत आहे. मानवी विकास जलदगतीने होताना निसर्ग मात्र संकटात सापडत चालला आहे. ज्या गोष्टी नैसर्गिकरीत्या वाढत होत्या त्याला कृत्रिमतेची जोड मानवाकडून देण्यात आल्याने याचा वाईट परिणाम होत आहे. कोकणातील सर्वच आंबा बागायतदार सध्या चिंतेत आहेत; पण निसर्गापुढे आपण काही करू शकत नाही, हे तितकेच खरे आहे. गेल्या चार पाच वर्षांत चक्री, तोक्ते, फयान यासारखी वादळे आली. त्यानंतर गेल्या तीन वर्षांत अवेळी पडणारा पावासाने शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यावर्षीच्या आंब्याची चव चाखण्यासाठी आणखी काही दिवस वाट बघावे लागणार आहे. २० ते ३० टक्क्यांनी उत्पादनात घटही असणार आहे. यंदा आंबा पीक उशिरा आल्याने तो प्रक्रियेसाठीसुद्धा कॅनिंग कंपन्यांमध्येही उशिरा दाखल होईल. कोकणातील अनेक महिला बचत गटसुद्धा हापूस आंब्यांची विक्री करून लाखोंची उलाढाल करत असतात. यावेळी त्यांनाही वाट पाहावी लागणार आहे.

# अशीही एक ’मॅडम’ ! घर समजून जिल्हा परिषद शाळेचं रुपडंच बदलले

### आजनगाव येथील गावकऱ्यांनी केला मंगला खटारे यांचा कार्य गौरव

## मंगला खटारे यांच्या सकारात्मक कार्याचे गावकऱ्यांकडून कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२धा.रेल्वे** - एखाद्या शिक्षकाने मनावर घेतले तर, तो शाळेत किती ‘पॉझिटिव्ह’ बदल घडवून आणू शकतो, याचे आदर्श उदाहरण तालुक्यातील आजनगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हणता येईल.एकट्या मुख्याध्यापिकेने अल्पावधीतच शाळेचे रंगरूप पालटून विद्यार्थ्यांना ‘हेल्दी’ वातावरण उपलब्ध करून दिले. प्रामाणिक प्रयत्नातून शाळेचा कायापालट केल्याबद्दल या शिक्षिकेची गावात वाहवा होत आहे. एका लहान गावात अशाच शाळेस नावलौकिक मिळवून देतानाच त्याचे रुपडे बदलून ती लक्षवेधी करण्याचा अफलातून प्रयत्न समोर आला आहे.

मंदिरासारखा शाळेचा जणू जीर्णोद्धार झाला.मंगला खटारे यांची या शाळेत येथे २०१८ पासून रुजू झाल्या तेव्हा पासून त्यांनी शाळेच्या विकासाचे ध्येय ठेवले होते.या शाळेत त्या एकट्याच शिक्षिका आहेत.त्यांनी निश्चय केला.पदर खोचून प्रथम शाळेच्या विकासाची,प्रगतीची जबाबदारी घेतली.ग्रामपंचायत,शाळा व्यवस्थापन समिती प्रशासनाची मदत घेत कामे केलीत..

पालकांच्या भेटीगाठी घेणे सुरू केले. त्यांना विश्वास दिला की तुमचा पाल्य मी घडविणार.अनेक कामे करायची असल्यामुळे त्यांनी गावकऱ्यांना मदतीचे आवाहन केले. गावकऱ्यांनीही त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या विधायक कार्यात आपापल्या परीने मदत केली.

तसेच विविध नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू केले. पालक त्यात सहभागी झालेत. बदलाचे पाऊल पडत असल्याचे दिसताच गावकरी शाळेच्या मदतीला धावून आले व आरोग्यदायी,शैक्षणिक वातावरण तयार केले.विकासाची तळमळ सार्थकी लागली. शाळेची आकर्षक प्रथमदर्शनी बाजू, हिरवळ, प्रसन्न वर्गखोल्या व त्यात गरीब कुटुंबातील मुलांचा किलबिलाट. आश्चर्य वाटावे असेच.



आणखी काही अभिनव उपक्रम राबवायचे आहेत. शाळेचं काम कधी संपत नाहीच.शाळेच्या वेळेपूर्वी एक तास व शाळेची वेळ संपल्यानंतर एक तास त्या शाळेला देते.शाळेची परसबाग व हिरवळ कायम फुलत राहावी यासाठी गावातील सर्वांचे सहकार्य मिळत आहे.हा सन्मान मी विद्यार्थ्यांच्या चरणी समर्पित करीत आहे.

**मंगला खटारे,**मुख्याध्यापिका जिल्हा परिषद शाळा आजनगाव

### गावकऱ्यांनी केला मंगला खटारे यांचा कार्य गौरव

आजनगाव येथील केला मंगला खटारे यांचा सोमवारला (ता.१०) कार्य गौरव केला.यावेळी गटशिक्षणाधिकारी सपना भोगावकर,केंद्रप्रमुख शरद कुकडे,माजी शिक्षण विस्तार अधिकारी सुनिल रोंघे,साधनव्यक्ती ज्योती राऊत वैशाली लिलर्व्हे,सरपंच सविता उईके,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भारती इंगळे,उपाध्यक्ष सविता चवरे,सदस्य सिमा वानखडे, मारोती झुरे,अंगणवाडी सेविका इंदिरा मंगाम,संगिता ताडाम,सुनंदा हलुमारे व आदी उपस्थित होते.

# बारमाही भाजीपाला शेतीसाठी भेंडी लागवड ठरतेय फायदेशीर

**दि.१२विदर्भ प्रजसत्ताक** – भेंडीमध्ये आरोग्यासाठी आवश्यक विविध जीवनसत्त्वे, लोह, खनिजे मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने वर्षभर चांगली मागणी असते. भेंडीच्या बियांपासून तेलही मिळू शकते.

भेंडीचा वापर कागद निर्मिती उद्योगामध्ये केला जातो. हिरव्या भेंडीच्या तुलनेने लाल भेंडीमध्ये अँटीऑक्सिडंट, लोह, कॅल्शिअमचे प्रमाण अधिक आहे. पंचतारांकित हॉटेल, मॉल, शहरी भागात या भेंडीला मागणी आहे.

**जमिन व हवामान**

– केवळ खरीप हंगामातच नाही तर रब्बी व उन्हाळी हंगामातही भेंडी लागवड करणे शक्य आहे.

– भेंडी पिकाला उष्ण हवामान चांगले मानवते.

– हलक्या जमिनीपासून ते काळ्या जमिनीपर्यंत कोणत्याही प्रकारच्या जमिनीमध्ये पुरेसे सेंद्रिय पदार्थ असलेल्या जमिनीत या पिकाची वाढ चांगल्या प्रकारे होते. मात्र, लागवड केलेल्या जमिनीतून पाण्याचा निचरा होणे आवश्यक असते.

**सुधारित जाती**

अधिक उत्पादनासाठी भेंडीच्या कोकण भेंडी, परभणी क्रांती, अर्का अनामिका, अर्का अभय, पंजाब–७, विजया, वर्षा उपहार, परभणी भेंडी, फुले विमुक्ता या सुधारित जातींची लागवड करावी.

**कशी कराल लागवड?**

– भेंडीची लागवड खरीप हंगामात जून–जुलैमध्ये, उन्हाळी हंगामात जानेवारी–फेब्रुवारीमध्ये, तर रब्बी हंगामात ऑक्टोबरमध्ये लागवड केली जाते.

– खरिपात लागवड करताना ६० बाय ६० सेंटिमीटर अंतरावर, तर उन्हाळ्यात ४५ बाय १५ सेंटिमीटर अंतरावर करावी.

– त्यासाठी हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे वापरावे. खरिपात हेक्टरी ८ ते १० किलो बियाणे पुरेसे होते.

– बी लावण्यापूर्वी पाण्यात किंवा सायकोसीलच्या (१०० मि.लि. प्रती लिटर) द्रावणात २४ तास भिजवावे.

– नंतर बियाणे काढून सावलीत कोरडे करून पेरावे. यामुळे उत्पन्न १० ते १५ टक्के वाढते.

आंतरमशागत

– दोन ते तीन आठवड्यांनी रोपांची विरळणी करावी.

– यावेळी खुरपणी करून तण काढावे.– साधारणतः दोन ते तीन खुरपण्या कराव्या लागतात.

**खत व पाणी व्यवस्थापन**

– भेंडीच्या पिकास हेक्टरी १५ टन शेणखत, १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व २५ किलो पालाश द्यावे.

– लागवडीच्यावेळी संपूर्ण स्फुरद, पालाश व एक तृतीयांश नत्र यांची मात्रा द्यावी.

– उरलेले दोन तृतीयांश नत्र समप्रमाणात लागवडीनंतर ३० ते ६० दिवसांनी द्यावे.

**काढणी**– भेंडीची काढणी फळे कोवळी असताना करावी.

– झाडास फुले येण्यास सुरुवात झाल्यापासून ६ ते ७ दिवसांत फळे काढणीसाठी तयार होतात.– जातीपरत्वे हेक्टरी १०० ते १२० क्विंटल उत्पादन मिळते.


– सतत पुरवठा करण्यासाठी भेंडी १५ ते २० दिवसांचे अंतर ठेवून टप्प्यात लागवड करावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष












## दही की ताक? आपल्या आरोग्यासाठी दोन्हीपैकी अधिक चांगलं काय?

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक** –दही आणि ताक हे दोन्हीही खरंतर अतिशय पौष्टिक पदार्थ. पण कधी कधी काही जणांना दही खाणं अजिबात सहन होत नाही. दही खाल्लं की लगेच सर्दी होते, सिडीटी होते किंवा इतर काही त्रास होतात. त्याउलट काही जणांना मात्र दही खाल्ल्याने काहीच त्रास होत नाही. उलट दही खाल्लं की ते फ्रेश होतात. मग दही खाणं नेमकं कोणासाठी चांगलं असतं आणि ताक पिणं कोणाला फायदेशीर ठरतं? या दोन्ही पदार्थांपैकी कोणता पदार्थ आपल्या तब्येतीच्या दृष्टीने आपल्यासाठी अधिक चांगला आहे हे प्रत्येकजण अगदी सहज ओळखू शकतो.




सगळ्यात पहिलं म्हणजे दही पचायला थोडं जड असतं. त्यामुळे ते रात्रीच्यावेळी खाऊ नये असा सल्ला दिला जातो. त्याउलट ताकामध्ये भरपूर प्रमाणात पाणी असल्याने ते पचायला अगदी सोपं असतं. शिवाय ताकामध्ये आपण मीठ, जिरेपूड, मिरच्या, कोथिंबीर असे पचनासाठी पुरक पदार्थ घालतो. त्यामुळे ते अधिक पाचक होतं. म्हणूनच ज्यांना पचनाचा त्रास असतो अशा लोकांनी दही खाण्याऐवजी ताक प्यावं. दह्याला आपण थंड पदार्थ समजतो. पण खरंतर ते उष्ण असतं. त्यामुळे ज्यांना सिडीटी, पित्त असा त्रास होतो अशा लोकांनी दही खाणं टाळावं. अशा लोकांनी ताक पिण्यास प्राधान्य द्यावं कारण ताक थंड असतं. ज्या लोकांची कफ प्रकृती असते अशा लोकांनीही दही खाणं टाळावं. कारण त्यांना दह्यामुळे सर्दी, शिंका, कफ असा त्रास होऊ शकतो. त्या लोकांना ताक पिणं मात्र चालतं. ताक तुम्ही तिन्ही ऋतूंमध्ये घेऊ शकता आणि ते कफ, वात, पित्त अशा तिन्ही प्रकृतीच्या लोकांना चालतं.

# अमरावतीत दृष्टिहीन दिव्यांग बांधवांसोबत अनोखे ’इको-फ्रेंडली धूलिवंदन’; उद्याला अनोख्या होळीचा रंगोत्सव!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती :**

वानमाला बहुद्देशीय संस्था, साद फाउंडेशन आणि दिशा बहुद्देशीय संस्था स्वराज्य प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अनोख्या होळी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयात १३ मार्च २०२५ रोजी 'इको-फ्रेंडली धूलिवंदन' कार्यक्रम होणार असून, विशेष म्हणजे हा सण दृष्टिहीन बांधवांसोबत साजरा करण्यात येणार आहे.

**कोरड्या रंगांची होळी, नव्या संकल्पांची उधळण, हर्षरंग सोहळा** !सणासुदीच्या उत्सवात कुणीही उपेक्षित राहू नये, या हेतूने हा अनोखा उपक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. दृष्टिहीन तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पद्धतीने होळीचा आनंद मिळावा, यासाठी कोरड्या रंगांची होळी खेळली जाणार आहे. सणाचा आनंद, स्पर्शाच्या माध्यमातून अनुभवता यावा, यासाठी विविध गाण्यांसह पारंपरिक पद्धतीने हा उत्सव साजरा होईल.

**समाजासाठी सकारात्मक संदेश**या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा कार्यक्रम फक्त एक सण नसून, समता, समरसता आणि आनंद यांचे प्रतीक आहे. विविध सामाजिक संस्था आणि नागरिक यामध्ये सहभागी होऊन हा सोहळा अधिक रंगतदार करणार आहेत.




# प्रो. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रीसर्चच्या वतीने संजिता मोहपात्रा यांचा सत्कार महिला दिनाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँन्ड रीसर्च, बडनेरा–अमरावती येथे संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. नितीन आर. धांडे मा. उपाध्यक्ष अॅड. उदयजी देशमुख, मा. कोषाध्यक्ष प्रा. (डॉ.) हेमंतजी देशमुख, मा. सचिव श्री. युवराजसिंगजी चौधरी, सन्माननिय सदस्य, मा. श्री. नितीनजी हिवसे, मा. डॉ. सौ. पुनमताई चौधरी, मा प्रा विनय गोहाड, मा पंकज देशमुख,मा गजानन काळे, तसेच महाविद्यालया चे प्राचार्य डॉ. गजेन्द्र बमनोटे यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रम करण्यात येते. याचाच भाग म्हणुन महाविद्यालयाची इंन्टर्नल कमिटी व वुमेन्स डेव्हलपमेंट सेल तर्फे महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होतेसदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. नितीन धांडे, जिप अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा संजिता महापात्रा, डॉ. गजेंद्र बमनोटे, इटर्नल कमिटी संयोजक, डॉ. जया इंगोले यांच्या उपस्थितीत पारपडला.यावेळी संजिता मोहपात्रा यांनी आपले अनुभव सांगितले, त्यांनी आपला आय ए एस चा प्रवास विदर्थ्यांना कथित केला,. कठीण परिश्रम तसेच सातत्याने अभ्यास केला तर हमखास यश मिळते. अध्यक्ष डॉ नितीन धांडे यांनी संजिता मोहपात्रा यांचे आभार मानले,कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.जया इंगोले, डॉ निकु खालसा, निकीता कदम, सुमेरा अहमद, रुचिता काळे, प्रिती लव्हाले, समृध्दी सगणे, मिनल निस्ताने, समृध्दी तायडे, प्रियंका राऊत, डॉ. पी. एम. इंगोले, प्रतिक्षा मुरादे, अश्विनी हांडे व नेहा चेडे यांनी प्रयत्न केले.



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# जिल्हा बँक अध्यक्ष बच्चू कडू अपात्रता प्रकरण हायकोर्टाकडून पुन्हा ८ दिवसांची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती –**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र करण्याकरिताविभागीय सहनिबंधकांनी नोटिस बजाविली होती. याबाबत त्यांना तोंडी म्हणणे मांडावयाचे असल्यास २४ फेब्रुवारीला स्वता किवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करण्याची संधी दिली होतीपरंतु बच्चु कडू यांनी १० मार्चपर्यंत मुदत मागितली होती. दरम्यान बच्चु कडू याबाबत उच्च न्यायालयात गेल्याने न्यायालयाने त्यांना

## १८ मार्च रोजी बाजु मांडण्यासाठी शेवटची संधी

शेवटची संधी देत पुन्हा आठ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता त्यांना १८ मार्च रोजी बाजु मांडणे अनिवार्य झाले आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेत उद्या सत्ता संघर्ष चांगलाच पेटला आहे. बबलू देशमुख गटातील संचालक हरीभाऊ मोहोड यांच्यासह ११ संचालकांनी बॅकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र करण्याबाबतची याचिका दाखल केली.नाशिक




जिल्हा न्यायालयाने त्यांना एका प्रकरणात एका वर्षाची शिक्षा ठोठावली असल्याचा दाखला त्यांनी यामध्ये दिला आहे. एक वर्षापेक्षा अधिक शिक्षा लागलेलेसंचालक हे या पदाकरिता अपात्र ठरतात अशी बँकेच्या उपविधीत तदतूद असल्याने या नियमांचा आधार घेत विभागीय सहनिबंधक यांनीआपणात अपात्र का करण्यात येऊ नये, अशी नोटिस ७ फेब्रुवारीच्या पत्रान्वे दिली. याकरिता बच्चु कडू यांना सोमवार, २४ फेब्रुवारी, रोजी दुपारी ३ वाजता साक्ष नोंदविण्याकरिता समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे, असे सुचविले होते. मात्र सुनावणीदरम्यान त्यांनी १० मार्च पर्यंत बाजु मांडण्याकरिता मुदत मागितली असता. त्यांची ही मागणी मान्य करीत विभागीय सहनिबंधकांनी त्यांना १० मार्च पर्यंत मुदतवाढ देत अपात्रतेबाबतचा खुलासा सादर करण्याचेआदेश दिले होते. परंतु त्यांना आणखी मुदतवाढीची अपेक्षा असल्याने अखेर त्यांनी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायालयाने त्यांना शेवटची संधी देत आठ दिवसांची म्हणजे १८ मार्च पर्यंत आपली बाजु मांडण्याकरिता मुदत दिली आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

# अमरावतीत पारा ४० अंसे. च्या पुढे जाण्याची शक्यता

## होळीच्या पूर्वीच दिवसा तापमानात लक्षणीय वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती–**

अमरावती सह विदर्भातील काही श्अहरांमध्ये तापमानात वेगाने वाढ होत असून हवामान खात्याने पुढील तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. विदर्भातील अकोला, ब्रम्हपूरी, चंद्रपूर या शहरातील कमाल तापमानाचा पारा वेगाने चढत आहे. तर त्याचवेळी नागपूर आणि वर्धा ही शहर देखील तापू लागली आहेत. असे असताना विशेषतः विदर्भातील अमरावती, नागपूर, अकोला, चंद्रपूर, वर्धा याजिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यंदा होळीच्या आधीपासूनच साधारणपणे फेब्रुवारीच्या मध्यान्हा पासूनच



उन्हाळ्याची चाहूल लागली. विदर्भातील काही जिल्ह्यात पारा ३५ अं.से.च्या पार गेला. आता दिवसा उन्हाचा तडाखा ॣ।।ढत असून नागरिकांना उष्णतेच्या तीव्र झळा जाणवत आहेत. तर

रात्रीच्या वेळी व सकाळी काही भागात अजूनही थंडी जाणवत आहे.

मार्च महिना सुरू होताच तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. विदर्भातील बहुतांश शहरांमध्ये देखील कमाल तापमानाचा पारा ३७ अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. विशेषतः विदर्भातील नागपूर, अकोला, चंद्रपूर, वर्धा आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.दरम्यान, भारतीय हवामान खात्याने विदर्भातील अनेक भागांत ११, १२ आणि १३ मार्च असे सलग तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. अकोला आणि चंद्रपूर या दोन शहरांमधील तापमान प्रामुख्याने वाढणार असून, नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान तज्ञांच्या अंदाजानुसार, यावर्षी तापमान सामान्यपेक्षा तीन ते चार अंश अधिक राहणार आहे, ज्यामुळे उन्हाळ्याचा तडाखा अधिक तीव्र जाणवेल. विदर्भातील उन्हाळा तसाही अधिकच तापलेला असतो.

# सहाय्यक कामगार आयुक्ताची खुर्ची, पाटी बाहेर फेकली

## दालनाला कुलूप लावून जाहीर केला निषेधसुरक्षा रक्षक मंडळाच्या अनेक समस्या प्रलंबीत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१२अमरावती**

कामगार उपायुक्त कार्यालयातील सहाय्यक कामगार आयुक्त मो. अब्दुल सैय्यद हे गेल्या सहा महिन्यापासून गैरहजर असल्याने सुरक्षा मंडळाशी संबधित रक्षकांच्या अनेक समस्या पलंबित आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या प्रहार कामगार संघटनेने आज ११ मार्च रोजी सुरक्षा रक्षकांसह कामगार आयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्तांची खुर्ची बाहेर फेकली. तसेच त्यांच्या नावाचा पाटी तोडून दालनाला कुलूप देखील लावल्याने चांगलीच खळबळ उडाली होती. सहाय्यक कामगार आयुक्त मो. अब्दुल सैय्यद हे सहा महिन्यापूर्वी अमरावती शहरातील कामगार उपायुक्त कार्यालयात रूजू झाले. परंतु, रूजू होताच दोन दिवसात मो. अब्दुल रजेवर गेले ते आजपर्यंत रूजू झाले नाही. सहाय्यक कामगार आयुक्त हे सुरक्षा रक्षक मंडळाचे अध्यक्ष असतात. सुरक्षा रक्षक मंडळामार्फत नियुक्त सुरक्षा रक्षक विविध शासकीय कार्यालयात तैनात असतात. त्यामुळे सुरक्षा रक्षकांच्या वेतनासह सर्वच प्रकारच्या समस्यांचे निराकरण कामगार उपायुक्त कार्यालयात करण्यात येते. परंतु, सहा महिन्यापासून मो. अब्दुल हे रजेवर असल्याने सुरक्षा, रक्षक महामंडळाची सर्वच कामे ठप्प पडली आहे. तसेच कित्येक महिन्यापासून रक्षकांचे वेतन सुध्दा झालेले नाही. त्यामुळे सुरक्षा रक्षकांमध्ये चांगलाच रोष निर्माण झाल झाला. याबाबत कळताच प्रहार कामगार संघटनेने कामगार उपायुक्तांना रूजू करून घेण्याबाबत किंवा त्यांच्या जागी दुसऱ्या उपायुक्तांच नियुक्ती करण्याबाबत अनेकवेळा कामगार उपायुक्तांना निवेदने दिली होती. परंतु, प्रहारच्या पत्राची कामगार उपायुक्तांनी दखल न घेतल्याने संतप्त झालेल्या प्रहार कार्यकर्ते आज ११ मार्च रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास सुरक्षा रक्षकांसह कामगार उपायुक्त कार्यालयात धडकले. संतप्त प्रहारच्या कार्यकर्त्यांनी रक्षकांसह मिळून कामगारउपायुक्त मो. अब्दुल यांच्या दालनातील त्यांची खुर्ची बाहेर फेकली.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायत विदर्भ प्रांत व हितगुज जेष्ठ भगिनी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिंन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

अ.भा.ग्राहक पंचायत व हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच जाधव पॅलेस येथे जागतिक महिला दिनाचा सोहळा जागतिक महिला दीन व जागतिक ग्राहक दिन यांचे औचित्य साधूनअखिल भारतीय ग्राहक पंचायत,विदर्भ प्रांताचे अध्यक्ष डॉ नारायण मेहरे यांच्या अध्यक्षतेत पार पडला.ते आपल्या भाषणात महिलांना संबोधून म्हणाले की,देशात महिला ग्राहकांची संख्या जास्त आहे.महीला ह्याच खऱ्या ग्राहक आहेत .महिलांना समंजस पने खरेदी करता यावी.कोणत्याही प्रकारची फसवणूक होणार नाही यासाठी जनजागृती आवश्यक आहे.पुढाकार घेऊन महिला सुध्धा जनजागृतीचे राष्ट्रीय कार्य करू शकतात .म्हणून महिलांनी ग्राहकांच्या हिताचे ज्ञान समजून घेण्यासाठी ग्राहक पंचायतशी जुळून ग्राहक पंचायत चे कार्य समजून घेतले पाहिजे . व निर्भिडपणे कार्य केले पाहिजे .असे उदबोधन केले.प्रमुख अतिथी अखिल भारतीय ग्राहक पंचायत विदर्भ प्रांतचे सचिव श्री नितीन काकडे यांनी महिला दिना निमित्त महिला मेळाव्याचे व विविध स्टॉल्स चे उद्घाटन केले.प्रमुख अतिथी म्हणून संघटन मंत्री डॉ अजय



गाडे व माजी नगरसेविका प्रभाताई आवारे यांनी मार्गदर्शन केले तसेच डॉ वसुधा ताई बोंडे,सुधा ताई जाधव यांची ही प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात प्रा अलकनंदा तुळजापूरकर यांनी म्हटलेल्या इतनि शक्ती हमे देना दाता या प्रार्थनेने झाली.मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. विवेका भेंडे यांनी स्वागत गीत सादर केले.ग्राहक गीत भंडारा येथील श्री साठे साहेब यांनी सादर केले.या प्रसंगी दैनिक अमरावती इविनिग व साप्ताहिक नई सूबह च्या संपादिका सौ मधू ताई बंग व बेघरांसाठी निस्वर्थपणे काम करणाऱ्या ज्योती राठोड यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.तसेच उत्कृष्ट संघ कार्यकर्ता म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार पटकावर्या,निबंध लेखनात राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त करणाऱ्या,एकच दिवशी १० पुस्तकांचे प्रकाशन करणाऱ्या, ,ग्राम गीताचार्य ही पदबी प्राप्त करणाऱ्या हितगुजच्या अध्यक्ष डॉ शोभा गायकवाड यांचा देखील अखिल भारतीय ग्राहक पंचायत विदर्भ प्रांत च्या पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला.याप्रसंगी दैनिक विदर्भ प्रजासत्ताकच्या संचालिका प्रा शुभांगी जोशी यांनी समाज माध्यम व महिला ह्या विषयावर, ऍड. प्रीती बनारसे यांनी स्त्रीवादी चळवळ आणि कायदे ह्या विषयावर, ऍड. डॉ. नीता कचवे ह्यानी ग्राहकांची फसवणूक व ग्राहक संरक्षण कायदाह्या विषयावर, प्रा जयश्री सातोकर ह्यानी पर्यावरण रक्षणत स्त्रियांची भूमिका ह्या विषयावर, आपापले अभ्यासपूर्ण विचार मांडले.याप्रसंगी आपल्या वयाची ८१ वर्षे आनंदाने व यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या रजनी ताई अकोलिकर,सीमा ताई पत्की,कुंदा ताई चावजी,अपर्णा ताई देशपांडे या भगिनीचा ८१ दिव्यांनी ओवाळून मंत्र ध्वनीच्या उच्चारणात ,शेले, स्वागत माळ, गजरा, हितगुज वार्शिकांक देऊन मैत्रिणींच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला.मार्च महिन्यात ज्यांचे वाढ दिवस आहेत अशा कळलं ताई भिंदे,कुंदा ताई चावजी, सुशीला देशमुख, संजीवनी देशमुख,नीता श्रीराव,पुष्पा मलगेवर पुष्पा गधिकर, निषातरोडकर,कमाल राठोड, डॉ अनुराधा वऱ्हाड,सीमा पतकी,यांच्यासाठी प्र अलकनंदा तुळजा पुरकर, व हितगुज मैत्रिणींनी वाढ दिवसाचे गाणे गाऊन शुभेच्छा दिल्या.नवीन सदस्य झालेल्या भगिनींना पुपगुच्च देऊन स्वागत करण्यात आले..प्रास्ताविक , व अतिथी परिचय हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ च्या अध्यक्ष डॉ शोभा गायकवाड यांनी करून दिला. संचालन सौ आशा नीचत, उपाध्यक्ष मालती सिसोदिया यांनी केले .आभार हितगुज सचिव विजया इंगोले यांनी केले.कार्यक्रमाला भगिनीची लक्षणीय उपस्थिती होती.महिलांनी विविध स्टॉल्स वरून खरेदीचा आनंद लुटला.

# ३८४ पदे रिक्त, आरोग्य केंद्रात स्वच्छता राहील तरी कशी ?

# जि.प. लिपीकवर्गीय कर्मचारी संघटनेचे मुख्यमंत्र्यांना पत्र

## १०० दिवसाच्या धडक मोहिमेतील अडचण दूर करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती–** परिचर व सफाई कर्मचाऱ्यांची नियमित पदे भरेपर्यंत बाह्य यंत्रणेद्वारे पदे भरण्याची परवानगी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात यावी अन्यथा मुख्यमंत्री १०० दिवसाच्या धडक मोहिमेदरम्यान कार्यालय स्वच्छ दिसेल की नाही, हे सांगता येणार नाही. जिल्हा परिषदेमध्ये ८७० पदे मंजूर असून ४८६ परिचर आहेत. तब्बल ३८४ पदे रिक्त असल्याचे जिल्हा परिषद लिपीकवर्गीय कर्मचारी संघटनेने मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

जिल्हा परिषद लिपीकवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष पंकज गुल्हाने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र दिले. या पत्रात त्यांनी नमूद केले की, संपूर्ण जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र व ईतर कार्यालयातील स्वच्छतेची व अन्य कार्यालयीन कामे करण्याकरिता अडचण निर्माण होत आहे. परिचर पदे भरण्यास शासनाची परवानगी नसल्यामुळे जिल्ह्यात४५ टक्के पदे रिक्त आहेत. जि.प. अंतर्गत ५९ प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्या अंतर्गत दवाखाने व ऑलोपॅथीक दवाखाने आहेत.




प्राथमिक आरोग्य केंद्र व अंतर्गत दवाखान्यातील परिचर पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत.

परिणामी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सफाईच्या कामावर परिणाम झालेला आहे. जिल्हा परिषद पशुसंवर्धन अंतर्गत १०१ पशुदवाखान्यात परिचरांची पदे रिक्त आहेत. पशुदवाखाना उघडण्याकरिता व बंद करण्याकरिता सुध्दा कर्मचारी नाहीत. ग्रामीण भागातील पशुदवाखान्यातील लसीकरण व इतर कामे करण्यास अडचण निर्माण होत आहे. त्याचबरोबर ग्रामीण पाणी पुरवठा सोबतच माध्यमिक शाळांमध्ये परिचरांची पदे रिक्त असल्याने स्वच्छता व इतर कामे करण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस धडक मोहिमेदरम्यान कार्यालय, दवाखाने, शाळा, पशुवैद्यकिय दवाखाने स्वच्छ दिसतील की नाही. हे सांगता येत नाहीत. म्हणून सन २०१५ पासून परिचर व सफाई कर्मचाऱ्यांची बंद असलेली भरती प्रक्रिया सुरु करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# भारत कृषक समाज संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचवा – प्रा.डॉ.हेमंत देशमुख

## नवनिर्वाचित अध्यक्षांना केला पदभार सुपूर्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती:**

भारत कृषक समाज संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोचविण्यासाठी नवनिर्वाचित अध्यक्ष व सचिव निष्ठेने काम करतील असा मला विश्वास असून हे कार्य मोठ्या जोमाने पार पडेल असा आशावाद व्यक्त करून प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी आपल्याकडील पदभार नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा.भैयासाहेब मेटकर यांना सुपूर्द केला.अमरावती जिल्हा भारत कृषक समाज या डॉ पंजाबराव देशमुख द्वारा स्थापित राष्ट्रीय संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रा. भैय्यासाहेब मेटकर तसेच सचिव पदी मधुकरराव काळे यांची यांची नियुक्ती महाराष्ट्र प्रदेश भारत कृषक समाजाचे चेअरमन श्री. प्रकाश श्रीरामजी मानकर यांनी नुकतीच एका पत्रकाद्वारे केली आहे . त्यांच्या कार्यकाळामध्ये निश्चितच भारत कृषक समाजाचे अमरावती जिल्ह्यामध्ये समाज उत्कर्षाचे काम संपन्न होईल व शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून विविध कार्यक्रम शेतकऱ्यांकरीता राबवण्यात येतील. यापूर्वी डॉ. हेमंत देशमुख यांनी सुद्धा या पदावर जिल्हाध्यक्ष मधून आपले काम चांगल्या पद्धतीने पार पाडले असून त्यांचा कार्यकाल संपल्याने प्रा. मेटकर यांची नियुक्ती या पदावर करण्यात आली आहे . नुकत्याच एका छोटेखानी कार्यक्रमांमध्ये हेमंत देशमुख यांनी आपल्या अध्यक्षपदाचा संपूर्ण कार्यभार नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा.भैय्यासाहेब मेटकर यांना दिला.त्यांच्या जिल्हाध्यक्ष नियुक्तीमुळे निश्चित भारत कृषक समाजाचे उद्बोधक कार्य पार पडेल असा विश्वास जिल्ह्यातील भारत कृषक समाजाचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी व्यक्त केला असून संपूर्ण जिल्हा तथा तालुका कार्यकारिणी गठीत




करण्याचा अधिकार सुद्दा प्रा. मेटकर यांना देण्यात आलेला आहे . या नियुक्तीबाबत त्यांचे विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात आले असून प्रा. भैय्यासाहेब मेटकर हे अतिशय मनमिळावू स्वभावाचे असल्याने तसेच त्यांच्यामध्ये सर्वांना सोबत घेऊन कामकरण्याची क्षमता असल्याने निश्चितच भारत कृषक समाजाची जिल्हाभर नियोजन पूर्वक बांधणी केल्या जाईल असा विश्वास मावळते अध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी व्यक्त केला.यावेळी कार्यक्रमाला भैय्यासाहेब वानखडे,नारायण मानकर, प्रा.नरेश पाटील ,राजाभाऊ रिठे,प्रताप देशमुख,राजाभाऊ हाके, प्रा.प्रकाश तायडे, भैय्यासाहेब निचळ,विलास राऊतयांची उपस्थिती होती.–

# जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केली जिल्हा सामान्य रुग्णालयाची पाहणी

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे दुसरे शैक्षणिक वर्ष लवकरच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (एजीएमसी) द्वितीय वर्षाचे सत्र सुरू होणार असल्याने जिल्हाधिकारी सौरभकटियार यांनी मंगळवारी जिल्हा सामान्य रुग्णालय येथील वॉर्ड आणि काही सुविधा जीएमसी व्यवस्थापनाकडे सोपविण्यासंदर्भातील बाबींचे निरीक्षण केले. त्यांनी जिल्हाशल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदले व जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी इर्विनची अधिकार्यासमवेत इर्विनच्या वॉर्डाची प्रत्यक्ष पाहणी केली.



तेथील प्रस्तावित बदलांची माहिती घेतली.

जिल्हाधिकार्यांनी स्वतः काही सूचनाही दिल्या. गतवर्षीपासून अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले आहे. या माध्यमातून अमरावतीकरांचे एक मोठे स्वप्न साकार झाले आहे. पहिल्या वर्षाच्या अभ्यासानंतर दुसर्या वर्षाचा अभ्यास सुरू होणार आहे.ज्यामध्ये नॅशनल मेडिकल कौन्सिलच्या मापदंडानुसार, वैद्यकीय महाविद्यालयाला विहित खाटांची संख्या असलेले रुग्णालय असणे बंधनकारक आहे. त्यामुळे इर्विन रुग्णालय आरोग्य विभागाकडून वैद्यकीय शिक्षण विभागाकडे निर्धारित कालावधीसाठी हस्तांतरित झाले आहे.

जिल्हाधिकारी त्यांच्या अधिनस्त अधिकार्यासह इर्विन रुग्णालयात पोहोचले. त्यांनी काही वॉर्ड आणि आरोग्य सुविधांची कसून पाहणी केली. प्रस्तावित बदलांवर चर्चा केली. यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, वैद्यकीय महाविद्यालयात पुढील वर्षासाठी नवीन प्रवेश व अभ्यास घ्यायचा आहे. त्यासाठी ते होत असलेले बांधकाम व नागरी काम पाहत आहेत.

**केंद्रीय प्रयोगशाळाही सुरू होणार**

केंद्रीय प्रयोगशाळेचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. सेंट्रल लॅब सुरू न करण्याबाबतच्या प्रश्नावर त्यांनी याबाबत माहिती घेऊन पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. तसेच सिटी स्कॅनसाठी जास्त पैसे आकारल्याच्या तक्रारीवर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकार्यांनी दिल्या. तक्रारी आल्यावर कारवाई केली जाईल, असेही जिल्हाधिकार्यांनी सांगितले. यावेळी महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. किशोर इंगोले हे ही प्रामुख्याने उपस्थित होते.

# होळी दहन, धुळवडीसाठी मोकळ्या मैदानाचा वापर करा रंगोत्सव साजरा करा पण जरा जपून महावितरणचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

होळीच्या उत्सवाला विजेच्या अपघाताने गालबोट लागू नये यासाठी होळी पेटवितांना संभाव्य अपघात टाळण्याकरिता आवश्यक ती खबरदारी घेत होळीचा आनंद व्दिगुणित करण्याचे आवाहन महावितरण अमरावती परिमंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

होळी पेटवितांना सभोवताली वीजवाहिन्या किंवा वितरण रोहीत्रे नाहीत याची खातरजमा करून घ्या, अन्यथा होळीच्या ज्वाळांनी वीजवाहिन्या वितळून जीवंत तार खाली पडून भिषण अपघात होण्याची शक्यता असते. याशिवाय अनेक ठिकाणी वीजवाहिन्या हया भुमिगत असल्याने, त्यापासून लांब अंतरावरच होळी पेटवावी जेणेकरून होळीच्या उष्णतेपासून भुमिगत वीजवाहिन्या सुरक्षित राहतील, होळी पेटवितांना शक्यतो मोकळया जागेचा वापर करा, ट्रक किंवा इतर वाहनांतून होळी आणतांना होळीचा स्पर्श रस्त्यालगतच्या वीजवाहिन्यांना होणार नाही याची खबरदारी घ्या, विजेचे अपघात हे प्राणघातक असल्याने एक चूकही प्राणांतीक अपघातास कारणीभूत ठरू शकते.त्याचप्रमाणे रंगोत्सव साजरा करतांना पाण्याचे फवारे वीज वाहिन्यापर्यंत उडणार नाही याची काळजी घ्या. रंग भरलेले फुगे फेकतांना ते विजेचे खांब आणि वीज वाहिन्या यांना लागणार नाही याची खबरदारी घ्या. वीज वितरण यंत्रणेचे रोहीत्रे व तत्सम वितरण उपकरणे बसविलेल्या जागेपासून लांब अंतारावरच रंग खेळा. रंग खेळतांना ओल्याचिंब शरीराने वीज खांबाला स्पर्श झाल्यास अपघाताचा संभाव्य धोका असल्याने विजेचा खांबांना स्पर्श करू नका. विजेच्या खांबासभोवती पाण्याचा निचरा होणार नाही याची खबरदारी घ्या. घरात होळी खेळतांना




वीज मिटर, विजेचे प्लग, वीज तारा आणि वीज उपकरणांचा पाण्यापासून बचाव करा, ओल्या हाताने वीजेच्या बटनांना स्पर्श करू नका.होळीचा सण हा आनंदाचा रंगोत्सव असल्याने महावितरणच्या आवाहनाप्रमाणे खबरदारी घेऊन होळीचा आनंद व्दिगुणित करण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

**हे लक्षात ठेवा**

वीज वितरण यंत्रणेपासून लांब अंतरावर होळी पेटवा
होळी आणतांना तीचा स्पर्श वीज वाहिन्यांना होऊ नये
वीज वाहिन्या, वितरण रोहीत्रांवर पाणी फ़ेकू नका
ओल्या शरीराने वीज उपकरणांना स्पर्शकरू नका
वीज खांबासभोवती पाण्याचा निचरा करु नका

**या ठिकाणी कॉल करा**

वीज यंत्रणेला आग लागणे , किंवा वीज अपघातासारखे काही अनेपेक्षीत प्रकार घडल्यास तात्काळ महावितरणच्या १८००२१२३४३५/ १८००२३३३४३५ या टोल फ्रि क्रमाकावर . तसेच अमरावती जिल्हयाकरीता असलेल्या ७८७५७६३८७३ व यवतमाळ जिल्हयाकरीता उपलब्ध असलेल्या ७८७५७६३०९९ या २४ तास सुरू राहणाऱ्या दैनंदिन सनियंत्रण कक्षाच्या नंबरवर कॉल करून तात्काळ माहिती देण्याचे आवाहन महावितरण अमरावती परिमंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# मोठ्या पदावर काँग्रेसचा डोळा, विरोधी पक्षनेतेपद मिळवणं ठाकरेंना सोप्प नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई :**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद मिळविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आधी एक दशांश सदस्य संख्येवरून घोडे अडले होते. त्यावर विधिमंडळ सचिवालयाने उत्तर दिले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस करणारे पत्र पाठविले. मात्र महाविकास आघाडीतील अन्य पक्षांनी पाठिंब्याचे पत्र अद्यापही दिलेले नाही. उलट,



काँग्रेसच्या तीन बड्या नेत्यांनी लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदासाठी मोर्चेबांधणी सुरु केली आहे.विधीमंडळातील सदस्य संख्येच्या किमान १० टक्के बळ असलेल्या पक्षाला विरोधी पक्षनेतेपद द्यावे असा संकेत आहे. त्यानुसार या पदासाठी किमान २८ आमदारांची गरज असते आणि ती संख्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे नाही. मात्र, अशा संख्येचे प्रावधानच नसल्याची भूमिका या पक्षाने घेतली. त्यासाठी दिल्ली विधानसभेचे उदाहरण देखील दिले गेले.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपच्या ८३ विद्यार्थ्यांचा दुबई येथे निःशुल्क अभ्यास दौरा

**विद्यार्थ्यांना विमानाने मोफत देश-विदेशात अभ्यास दौरा आयोजित करणारा महाराष्ट्रातील एकमेव एज्युकेशनल ग्रुप : दुबई येथे नामांकित विद्यापीठ , आय.टी. इंडस्ट्री व ऑटोमोबाईल सेक्टर येथे भेटी**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, तंत्रज्ञानाची जाण आणि औद्योगिक ज्ञानवृद्धीसाठी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. याच पार्श्वभूमीवर यावर्षी संस्थेने ८३ गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दुबई येथे मोफत अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले आहे. हा अभ्यास दौऱ्या मध्ये दुबईतील नामांकित विद्यापीठे, आयटी, ऑटोमोबाईल आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स उद्योगांना भेटी देण्यात येणार आहे.

**विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील अनुभव देणारा अभ्यास दौरा**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप हा महाराष्ट्रातील एकमेव शैक्षणिक गट आहे, जो विद्यार्थ्यांना मोफत विमान प्रवास, पंचतारांकित हॉटेलमध्ये निवास, प्रतिष्ठित उद्योगांना भेटी आणि पर्यटनाचा संपूर्ण खर्च स्वतः करतो. गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने संस्थेने मलेशिया, दुबई, सिंगापूर आदी देशांत विद्यार्थ्यांकरिता मोफत अभ्यास दौरे आयोजित केले आहेत. यावर्षी इंजिनिअरिंग, एमबीए, एमसीए, फार्मसी, कृषी, आर्किटेक्चर, बी.ए.एम.एस. आणि नर्सिंग या महाविद्यालयांतील ८३ गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दुबई अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अभ्यास दौऱ्याचा कालावधी १५ मार्च २०२५ ते २२ मार्च २०२५ असा आठ दिवस दिवसांचा असणार आहे.

**दुबईतील नामांकित विद्यापीठांशी शैक्षणिक करार**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे दुबई येथील बिट्स पिलानी, युनिव्हर्सिटी ऑफ दुबई, अमेरिकन युनिव्हर्सिटी ऑफ दुबई युनिव्हर्सिटी ऑफ बर्मिंगहॅम यांसारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत करार झाले असून विद्यार्थ्यांना याठिकाणी तज्ज्ञ मार्गदर्शन, प्रयोगशाळांमध्ये प्रशिक्षण आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर कार्यशाळांमध्ये सहभागी




होता येईल.तसेच, आयटी, ऑटोमोबाईल, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इलेक्ट्रिक वाहन (EV) क्षेत्रातील कंपन्यांना भेटी देण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. या दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक तंत्रज्ञानाचा परिचय होईल आणि त्यांच्या करिअरसाठी नवीन संधी उपलब्ध होतील.

**जपान आणि कोरियामध्ये अभ्यास दौऱ्यांचे पुढील लक्ष्य!**

अंतरराष्ट्रीय पातळीवर - विदेशांमध्ये अभ्यास दौरे आयोजित करून विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला चालना देणारा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप सातत्याने राबवत आहे येणाऱ्या वर्षांमध्ये जपान व कोरिया येथे विद्यार्थ्यांना अभ्यास दौऱ्यासाठी घेऊन जाण्याचा संस्थेचा मानस आहे. संस्थेने तेथील उद्योग आणि विद्यापीठांशी शैक्षणिक करार केले असून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी नवीन संधी उघडतील असे प्रतिपादन संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी केले.

**विद्यार्थ्यांसाठी अनमोल संधी पालकांमध्ये आनंदाचे वातावरण**

अभ्यास दौऱ्यासाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे व्यवस्थापक, प्राचार्य, उपप्राचार्य आणि विभागप्रमुखांनी शुभेच्छा दिल्या असून, या मोफत अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# संत्रा उत्पादक शेतकरी स्पेन वरून मायदेशात दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प ,सह्याद्री फार्मर प्रोडूसर कंपनी नाशिक ,ग्रोवीजन ग्रुप नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पेन येथे गेलेले सर्व संत्रा उत्पादक शेतकरी मायदेशात परतले .व्हॅलेन्सिया शहरात मोठ्या प्रमाणात मोसंबी, संत्रा लागवड होते. लागवडीतील आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया व उद्योग, नर्सरी व्यवस्थापन, बाजारपेठस्पेन येथे गेलेल्या सर्व शेतकरी बंधूंनी व्यालेन्सिया येथील संत्रा बागेत भेट दिली .

तेथील बगीच्यातील चुनखडीयुक्त मध्यम दर्जाची असून पाच फूट बेडवर संत्रा झाडाची लागवड केली जाते .त्या संत्रा झाडाच्या लागवडीचे अंतर ६ह्२० वर चार फूट उंचीच्या बेडवर केली जाते. एका हेक्टर मध्ये ८२० कलमा



या पद्धतीने बसविल्या जातात. संत्राच्या कलमा हा सर्व सरकारच्या नियमांच्या अधीन राहून तयार केल्या जातात तिसऱ्या वर्षापासून संत्र्याच्या झाडाचे पीक घेणं सुरुवात होते . तेथील झाडाची उंची आठ ते दहा फुटावर पर्यंत तेथील प्रत्येक झाडा वरपानांची संख्या भरपूर प्रमाणात आढळून आली.तेथील फर्टीगेशन सरळ ड्रीपच्या माध्यमातून केल्या जाते . तिथे जास्तीत जास्त मल्चिंग पेपर झाकण्यासाठी वापर केले जातो.तिथे लोक पूर्णपणे सामूहिक शेती त्या देशामध्ये टँगो ही व्हेरायटी सगळ्यात जास्त फळपीक देणारी संत्राची जात असून. हेक्टरी उत्पादन ७० टन घेतल्या जाते. तेथील संत्र्याच्या प्रत्येकझाडाची कटिंग १० पर्सेंट केल्या जाते व वाढलेल्या फांद्या ४५ डिग्री अंश सेल्सिअस मध्ये झुकवून दोरीने बेंड करून जमिनीत रोवलेल्या काड्यांना दोरीच्या साह्याने बांधल्या जातात .विशेष म्हणजे संत्रा ची तोडणी होण्या दोन महिन्यापूर्वी फवारणी बंद केली फवारणीचे तसेच माती ,पाणी परीक्षणाचे निकष तेथील सर्व शेतकऱ्यांना सरकारच्या अधीन राहून पूर्णपणे नियम पाडावे लागतात.तेथील तापमान ७ ते १२ डिग्री हिवाळ्यामध्ये तर उन्हाळ्यामध्ये ३८ ते ४४ डिग्री दरम्यान असते . त्यानंतर कोर्डोबा संत्रा पॅकिंग हाऊस येथे भेट त्यानंतर सेविल येथील पॅकिंग हाऊस व ग्रीकल्चर यूनिवर्सिटी येथे भेट देऊन एलईडी स्क्रीन द्वारे माहिती संत्रा वर्गीय फळ पिकाचे तंत्रज्ञान मार्केटिंग व्यवस्थापन जाणून घेतले. शेवटच्या दिवशी संत्रा उत्पादकशेतकऱ्यांनी स्पेन ची राजधानी माद्रिद लोकसभा भवन तेथील बाजारपेठ येथे सुद्धा भेट दिली.या दौऱ्यामध्ये श्री नितीनजी गडकरी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री भारत सरकार ,कांचनताई नितीनजी गडकरी, विलासजी शिंदे सह्याद्री फार्मर प्रोडूसर कंपनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संस्थापक, अजहर तंबूवाला सहकारी संस्थापक आणि कार्यकारी संचालक, पवन मोहरुत सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनी अधिकारी, प्रवीण शेळके सह्याद्री फार्मर प्रोडूसर कंपनी अधिकारी अरुण आकोटकर, नाथा पाटील ,अपूर्व जवंजाळ ,श्रीधर ठाकरे अजिंक्य तिडके ,मनोज जवंजाळ, निलेश रोडे, राकेश मानकर ,मोरेश्वर वानखडे, आकाश पवार, प्रशांत कुकडे, नवीन पेठे, विठ्ठल भोसले ,प्रल्हाद शेळके ,सुहास तेल्हारकर ,स्वप्निल धोटे ,तुषार तायवाडे, शिवदीप भुमरे, अनिल राऊत, विशाल लंगोटे ,सुधीर दिवे, रवींद्र बोरटकर, उद्धव फुटाणे, व्यंकट शिंदे, विनोद राऊत ,पुष्पक खापरे, हे सर्वजण शेतकरी दौऱ्यामध्ये होते. शेतकऱ्यांना सुद्धा नवीन तंत्रज्ञान शास्त्रज्ञ यांच्या माध्यमातून भरपूर काही माहिती मिळाली. त्याबद्दल सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनीचे सर्व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी आभार मानले.

# योग आणि निसर्गपोचार केंद्र अमरावती येथे महिला दिन उत्साहात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

जागतिक महिला दिनानिमित्त योग आणि निसर्गोपचार केंद्र अमरावतीच्या वतीने अनेक कार्यक्रम आयोजीत करून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरण, महिला शक्तीला प्रोत्साहन, आणि महिलांच्या हक्कांची अंमलबजावणी सोबतच महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याबाबत माहिती देण्यात आली...

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून प्रमुख अतिथीच्या हस्ते करण्यात आले.. त्यांनतर प्रमुख पाहुण्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले.. योग आणि निसर्गोपचार केंद्राच्या संचालिका कल्पना मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.. योग आणि निसर्गपोचार केंद्र अमरावती येथे महिला दीना निम्मित वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.



त्यात विविध खेळ, डान्स, गायन, मनोरंजन, योगा आणि महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्या बद्दल माहिती सांगण्यात आली.. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपच्या सौ कल्पना विघे सोबतच उषा मोहोड़, कल्पना मोहोड़, कमला थोरात, ज्योति नागराज,पुष्पा इंगले होते.. कार्यक्रमाचे संचालन सौ सोनल निर्बाण यांनी केले आणि आभार प्रदर्शन सौ सोनाली पागदुने यांनी मानले.. या कार्यक्रमाला नेहा जोशी, नीलिमा बोराड, प्रतीक्षा पाटिल, कल्पना यावलकर, मेघा गोरटे, माधुरी जस्वन्ते, अर्चना कवडे, कल्पना मोहोड़, उषा मोहोड़, कमला थोरात, स्वाति मालवनकर, ज्योति नागराज, सायली मेश्राम, स्वाति ठाकरे, प्रतिभा वासनकर, मंगला थूल, पुष्पा इंगळे उपस्थित होते...

# अवनीश वेलफेअर फाउंडेशनच्या स्पेशल चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटरचे उद्घाटन

## माजी पालकमंत्री आ. प्रवीण पोटे पाटील यांनी पाच वर्षाकरिता स्वीकारले पालकत्व

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

स्थानिक नवसारी रोड येथील रेखा कॉलनी येथे स्थित अवनीश वेलफेअर फाउंडेशनच्या विशेष मुलांच्या डेव्हलपमेंट सेंटरचे लोकार्पण नुकतेच संपन्न झाले.विशेष मुलांच्या या डेव्हलपमेंट सेंटर मध्ये मुलांच्या वैयक्तिक, शैक्षणिक, शारीरिक व बौद्धिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतांचा पुर्ण विकास करणे, त्यांना आपल्यासोबत घेऊन त्यांच्या गरजेनुसार त्यांच्यातील कमी असलेल्या बाबींचा आयुर्वेदिक, लोपॅथीक, होमिओपॅथीक औषधीचा समतोल वापर करुन त्यांना गरजेनुसार वेळोवेळी डॉक्टरांच्या सल्लयाने त्यांना पूर्ण करणे.ब्रेन डेव्हलपमेंट आणि शारीरिक डेव्हलपमेंट यासाठी सुसज्ज परिसर आणि विशेष शिक्षक देऊन त्यांच्या कडून ऍक्टिव्हिटी करुन घेणे.या विशेष मुलांना फिजिओथेरपी,आयुर्वेदिक शिरोधारा, हसतखेळत शिक्षण, वेळोवेळी दंत आणि डोळ्यांची चिकित्सा अशा सर्व सोई एकाच जागी निर्माण करणे असे हे डेव्हलपमेंट सेंटर स्थापन करण्यामागील उद्दिष्ट आहे. अशा सर्व प्रकारच्या सोयी एकाच ठिकाणी असलेले अमरावती मधील एकमात्र असणार आहे.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून नामफलकाचे विमोचन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवर आणि उपस्थित विशेष मुलांच्या शुभहस्ते फीत कापून डेव्हलपमेंट सेंटरचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. माजी आमदार बच्चू कडू आणि माजी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी अत्यंत आत्मीयतेने



डेव्हलपमेंट सेंटरचे अवलोकन केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे रोपटे व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. अवनीश वेलफेअर फाउंडेशनचे संचालक योगेश देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि डेव्हलपमेंट सेंटर करण्यामागचा आपला हेतू अत्यंत हृदयस्पर्शी पद्धतीने सर्वांसमोर मांडला.विशेष मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये चाहत भराणी हिने 'हम होंगे कामयाब एक दिन..' हे गाणे म्हटले, युवांश साहू आणि वर्शिका देशमुख हिने अतिशय सुंदर नृत्य सादर केले. विशेष शिक्षिका कांचन दुधे यांनी विशेष मुलांच्या रोजच्या येणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला. माझी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी अत्यंत भावना स्पर्शी विचार मांडले. डेव्हलपमेंट सेंटर आणि ते सुरू करण्यामागचा उद्देश याची त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. येणाऱ्या काळात डेव्हलपमेंट सेंटरला ४० हजार फूट जागा देण्याचे देखील पोटे यांनी आश्वासन दिले.तसेच येणाऱ्या पाच वर्षांकरिता प्रत्येक महिन्याला एक लक्ष रु डेव्हलपमेंट सेंटरला देण्याचे कबूल करून जणू काही येणाऱ्या पाच वर्षांकरिता डेव्हलपमेंट सेंटरचे पालकत्व स्वीकारले. या व्यतिरिक्त प्रत्येक अडचणीमध्ये मी या विशेष मुलांच्या सोबत असुन यापुढे पण काही गरज असल्यास त्या देखील पूर्ण करणार असे आश्वासन पोटे पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. समाजामध्ये वावरणारे विशेष गुण हे दुर्लक्षितच असते पण त्यांच्या मध्ये कशाप्रकारे सुधारणा करता येईल याची जबाबदारी अवनीश फाउंडेशनने घेतली याबद्दल बच्चू कडू यांनी समाधान व्यक्त केले. भविष्यामध्ये डेव्हलपमेंट सेंटरची इमारत बांधायची असल्यास त्याला पूर्ण सहकार्य करेल अशी ग्वाही देखील त्यांनी यावेळी दिली. यावेळी मंचावर माजी नगरसेवक प्रशांत डवरे , प्रशांत महल्ले, तिवसाचे माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे तसेच ऋषिकेश देशमुख उपस्थित होते.

# शासन निर्णय रद्दसाठी शिक्षक समिती करणार आंदोलन

## १७ मार्च ला जिल्हाधिकारी कार्यालयावर प्राथमिक शिक्षकांचे धरणे आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

राज्यातील शाळांमधील शिक्षक संख्येवर प्रतिकूल परिणाम करणारा व स्वतःच्या गावातील शिक्षण मिळविण्याचा हक्क डावलणारा शासन निर्णय रद्द केला पाहिजे, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती १७ मार्च रोजी संपूर्ण राज्यात धरणे व निदर्शने आंदोलन करणार आहे.अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी १२ते५प्राथमिक शिक्षक धरणे आंदोलन करणार आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिलेल्या माहितीनुसार १५ मार्च २०२४ शासन निर्णयानुसार २०२४-२५ संचमान्यता अंतिम करण्यात आली आहे. शिक्षण कायद्यातील तरतुदीच्या व २८ ऑगस्ट २०१५ (सुधारित ८ जानेवारी २०१६) विसंगत अशा शासन निर्णयाने शाळांमध्ये शिक्षकच असणार नाही, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे राज्यात हजारो शिक्षक अतिरिक्त होतील. शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणात अडसर निर्माण होईल.

शाळेत शिक्षक नसल्याने व अत्यंत कमी शिक्षक असल्याने पालकांना आपल्या पाल्यांना परगावच्या शाळेत दाखल करावे लागेल. विद्यार्थ्यांच्याशिक्षणाची परवड होईल व मुलींची सुरक्षितता धोक्यात येण्याची स्थिती आहे. दररोज जाणे-येणे करण्याच्या स्थितीमुळे गळतीचे प्रमाण वाढेल.

याबाबत २५ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय अद्यापही रद्द करण्यात आलेला नाही. शिक्षक संख्येवर प्रतिकूल परिणाम करणारा व स्वतःच्या गावातील शिक्षण मिळविण्याचा हक्क डावलणारा शासन निर्णय रद्द केला पाहिजे, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती १७ मार्च रोजी संपूर्ण राज्यात धरणे व निदर्शने आंदोलन करणार आहे.या आंदोलनात शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहनराज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगाकर, शिक्षक नेते,उदय शिंदे, गोकुलदास राऊत,जिल्हा सल्लागार संभाजी रेवाळे, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यनिंकेले आहे.

# संघ मुख्यालयाची 'रेकी', दहशतवाद्याचा जामिनासाठी अर्ज




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालय परिसराची आणि स्मृती मंदिर परिसराची रेकी केल्याचा आरोप असलेल्या कथित दहशतवाद्याने जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली आहे. रईस शेख असे या आरोपीचे नाव आहे. त्याला नागपूरच्या दहशतवाद विरोधी पथकाने काश्मीरमधून याला अटक केली होती.

सप्टेंबर २०२१मध्ये रईसला काश्मीर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे अटक केली. चौकशी दरम्यान असे समोर आले होते की, त्याने १५ जुलै २०२१ ला नागपुरात रेकी केली होती. त्यामुळे कोतवाली पोलिसांनी रईस शेखच्या विरोधात गुन्हा दाखल केला आणि पुढे त्याला काश्मिरात जाऊन ताब्यात घेतले. पाकव्याप्त काश्मीरमधून जैश-ए-मोहम्मदच्या म्होरक्याच्या सांगण्यावरून रईस शेख जुलैमध्ये नागपुरात आला होता. नागपुरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची इमारतीची त्याने पाहणी केली आणि तो काश्मीरला परतला. कुणाला संशय येऊ नये म्हणून त्याने श्रीनगर ते दिल्ली, दिल्ली ते मुंबई आणि मुंबई ते नागपूर असा विमान प्रवास केला. त्यानंतर एका हॉटेलमध्ये रुम बुक केली आणि रिक्षाने दोन्ही ठिकाणांची टेहळणी केली होती. या ठिकाणांचे दुरूनच छायाचित्रण करून त्याने ते पाकिस्तानमधील म्होरक्याला पाठवले होते. नागपूर एटीएसने या घटनेचा तपास केला होता. सप्टेंबर २०२१ मध्ये रईसला काश्मीर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे अटक केली होती.२०२१ मध्ये जानेवारी महिन्यात रईस अहमद शेख सदाउल्ला शेख याला काश्मीर पोलिसांनी अटक केली होती. त्याने काश्मिर पोलिसांकडे नागपुरातील संघ मुख्यालयात टेहळणी केल्याची कबुली दिली होती. त्यानंतर नागपूर पोलीस दलाचे उपायुक्त चिन्मय पंडित यांनी काश्मीरला जाऊन रईसची चौकशी केली होती, हे विशेष. त्यानंतर नागपुरात कोतवाली पोलिसांनी रईस शेखच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर नागपूर दहशतवाद विरोधी पथकाने काश्मिरला जाऊन त्याला ताब्यात घेतले. २०१४ साली केंद्रात भाजपची सत्ता आल्यानंतर संघाचे राजकीय महत्व वाढलेले आहे. यानंतर संघाच्या सुरक्षेकडे सुरक्षा यंत्रणांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

# उन्हाळा लागला; खबरदारी घ्या, कूलरचा शॉक टाळा : ओल्या हातांनी कूलरला स्पर्श करणे ठरते धोक्याचे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती ३५**

उन्हाळा सुरू होताच घरांमध्ये आणि दुकानदारांकडून कूलरचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू होतो. मात्र कूलर वापरताना आवश्यक ती सुरक्षा न बाळगल्यास विजेच्या धोक्यामुळे गंभीर अपघात होऊ शकतात. अनेकदा शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे कूलर सुरक्षितरित्या वापरण्याचे आणि विजेच्या धक्क्यापासून धोक्यापासून बचाव करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.कूलर सुरू असताना किंवा त्यात पाणी भरताना ओल्या हातांनी स्पर्श केल्यास विजेचा धक्का बसू शकतो. अशा घटना अनेकदा घडल्या आहेत.



कूलरमध्ये पाणी भरताना विजेचा पुरवठा पूर्णपणे बंद ठेवावा. थ्री-पिन प्लग चा वापर करावा आणि अर्थिंग व्यवस्थित तपासा विजेच्या गळतीमुळे धोका वाढतो. त्यामुळे अर्थिंग लिकेज सर्किट ब्रेकर बसवावे. पाणी भरण्यासाठी प्लास्टिकच्या पाइपचा वापर करावा. कूलरच्या बॉडीला स्पर्श करू नये. कूलरच्या वायर आणि स्विच वेळोवेळी तपासा आणि जीर्ण झाल्यास त्वरित बदलवावा. असे आवाहन महावितरणने नागरिकांना केले आहे.

**घरातील वीज उपकरणांची तपासणी करणे गरजेचे**

गेल्या काही वर्षात कूलरच्या शॉकमुळे अनेक अपघात झाले आहेत. थोडीशी खबरदारी घेतल्यास जीवितहानी आणि आर्थिक नुकसान टाळता येईल.विजेच्या उपकरणांची वेळोवेळी तपासणी करून योग्य ती सुरक्षा पाळल्यास कूलरचा उपयोग सुरक्षितरित्या करता येईल.

# होळीसाठी वृक्ष तोडाल तर पोलीस कोठडीत जाल


## अमरावती महानगरपालिकेतर्फे नागरिकांना वृक्ष न तोडण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आपण जाणताच एक-एका वृक्षाचे व वनाचे महत्व किती आहे ते सांगण्याची गरज आहे, असे आम्हाला वाटत नाही. कारण वृक्ष आहेत, म्हणुनच सजिवांना अन्न, पाणी व शुध्द हवा (ऑक्सीजन) मिळते. वृक्ष हेची जिवन होय. आपण सर्व वृक्ष प्रेमी आहोत व वृक्षांची नितांत गरज मानव जातीला आहे, हे लक्षात घेवुन अग्नी पुजना करीता होळीला केवळ हौशी खातर वृक्षांची कत्तल करुन होणारी लाकडाची होळी थांबवावी व वृक्ष पुजनाने होळी सन साजरा करावा.

त्यासाठी आपण आपल्या मुलांना, शाळेतील विद्यार्थ्यांना, शेजारी, गावातील, वार्डातील आबाल वृध्दांना पटवुन देवुन या कामात सहकार्य करुन, होळीचा सन वृक्ष वाचवुन साजरा करावा.

होळीकरीता एकही वृक्ष तोडल्या जाणार नाही यासाठी प्रयत्न करावे. कारण वृक्ष एक दिवसात किंवा एक वर्षात मोठे होत नाहीत. आम्हाला आशा नव्हे तर खात्री आहे. आपण यात आपले योगदान द्याल व वृक्ष पुजनाने देखील होळी सन साजरा केल्या जावु शकतो, हे दाखवुन द्याल. आपल्या प्रयत्नास आमच्या शुभेच्छा ! हा संदेश सर्वत्र पोचविण्यास सहकार्य करावे ही आग्रहाची विनंती.



तथापी अग्नीपुजन करणे अत्यावश्यकच असेल तर पडलेल्या अथवा वाळलेल्या वृक्षांच्या अवशेषाचा वापर करुन सार्वजनिक अग्नीपुजन करावे असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

अवैध वृक्षतोड करणा-यास वरील कायद्याने दंड व शिक्षेची तरतुद आहे. अवैध वृक्षतोड करणे उपरोक्त कायद्याच्या सेक्शन ५ कलम ८ (१), सेक्शन ८ कलम २१(१) (२), नुसार गुन्हा ठरतो. तसेच वृक्ष सार्वजनिक जागेवरील असल्यास आय.पी.सी.नुसार ३७९, ५११, ४२७ कलम लागू होईल आपल्या घराच्या परिसरात वृक्षलागवड करुन वृक्ष वाढविणे कायद्याने बंधनकारक आहे.


सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, होळीकरिता कुणीही वृक्ष अथवा वृक्षांच्या फांद्या तोडु नये, वृक्ष किती महत्वाचे आहे हे आपणास माहित आहे. आपली मुले, विद्यार्थी, मित्र केवळ हौस म्हणुन होळीकरिता वृक्ष तोडतात त्यांना त्यापासुन परावृत्त करा व झाडे वाचवा. कोणत्याही परिस्थितीत वृक्ष तोड करु नये. वृक्ष तोडणे, फांद्या तोडणे अथवा झाडाला इजा होईल अशी कोणतीही कृती करणे हा कायद्याने गुन्हा आहे. आपल्या घरी, मोहल्ल्यात, वार्डात होळीनिमित्त होणा-या वृक्षपुजन कार्यक्रमात सहभागी व्हा व वृक्ष वाचविण्याकरिता, वाढविण्याकरिता सहकार्य करा. वृक्ष पुजन करुन देखील होळी साजरी होवु शकते हे सिध्द करा. अग्नीपुजन करायचे असेल तर वृक्षांच्या पडलेल्या अवशेषाचा वापर करावा परंतु कोणत्याही परिस्थितीत वृक्ष तोड करु नये.

# बेलोरा विमानतवरून स्टार अलायन्स एअरलाईनचे विमान घेणार उड्डाण

## २-३ दिवसात मिळणार डीजीसीएचे लायसन्स मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राहणार उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या घोषणेनुसार, बेलोरा विमानतळावरुन बहुप्रतिक्षीत प्रवासी विमानाच्या उड्डाणाचे काऊंटडाऊन सुरु झाले आहे. यानुसार बेलोरा एअरपोर्टवरील पहिल्या फ्लाईटच्या टेक ऑफसाठी आता केवळ २० दिवस उरले आहेत. यासोबतच अमरावतीकर नागरिकांच्या स्वप्नांना पंख फुटणार आहेत. पहिल्या उड्डाणाच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, आकस्मिक अडचण न उद्भवल्यास ३१ मार्चला बेलोरा विमानतळावरुन फ्लाईटचे टेकऑफ करणे निश्चीत आहे.



विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री अजित पवारांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना घोषणा केली होती की, ३१ मार्चपासून अमरावतीच्या बेलोरा एअरपोर्टवरुन प्रवासी विमानसेवा सुरु होईल.या घोषनेनंतर शहरात आनंदाचे, आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

**...तर ३१ मार्चला पहिले उड्डाण पहिल्या विमान उड्डाणाची नागरिक**

आतुरतेने प्रतिक्षा करीत आहेत. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी माहिती दिली की, पहिल्या फ्लाईटच्या वेळी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहतील. कोणतीही आकस्मिक अडचण न उद्भवल्यास बेलोरा विमानतळावरुन ३१ मार्चला फ्लाईटचे टेक ऑफ निश्चीत आहे.

**तूर्त एक फ्लाईट होणार सुरु**

बेलोराएअरपोर्टवरुन सध्या मुंबईकरिता एक फ्लाईट सुरु करण्यात येईल. काही काळानंतर नाईट लँडींगची सुविधा होताच, येथून रात्रीही उड्डाण सुरु करण्यात येईल. नाईट लँडींगकरिता आवश्यक सुविधा तयार करण्याचे काम युध्दस्तरावर सुरु आहे.मुंबई नंतर पुणे व दिल्ली साठी सेवा सुरू होण्याची शक्यता आहे.

**स्टार अलायंस एअरलाइन्सला सकाळचा स्लॉट**

बेलोरा विमानतळावरुन स्टार अलायन्सएयरलाईनसचे ७२ आसनी विमान प्रवाशांना घेऊन मुंबई करिता उड्डाण घेईल. याकरिता स्टार एयरलाईनला बेलोरावरुन मुंबईकरिता उड्डाण घेण्याकरिता सकाळचा स्लॉट मिळाला आहे. यानुसार पहिले उड्डाण सकाळी ८ ते ८-३० च्या दरम्यान असण्याची शक्यता आहे.

# २१ दिवसांत १६९ कोटी कसे खर्च करणार?

## डीपीसीचा ४७५ कोटींचा आराखडा : विविध यंत्रणेकडेवितरित झाले ३०५ कोटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

शासन स्तरावरून येणाऱ्याविकासनिधीचे नियोजन जिल्हा स्तरावर केले जाते. वार्षिक आराखडा तयार करून योजनानिहाय हा निधी वितरित केला जातो. यासाठी ग्रामीण, शहरी आणि दुर्गम भाग यातील कामांचा प्राधान्यक्रम निश्चित केला जातो. त्यानंतरच विकासाला गती मिळते. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा जिल्हा नियोजन विभागाचा सुमारे ४७४ कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला होता. यापैकी आतापर्यंत ३०५ कोटी रुपयांचा निधी विविध विभागांना योजनानिहाय निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी मंजूर कामानुसार संबंधित यंत्रणांना वितरित केला जाईल. मंजूर कामे संबंधित यंत्रणाकडून केली जाणार आहेत. मार्च एडींगसाठी २१ दिवसांचा अवधी असल्याने उर्वरित निधी हा शंभर टक्के खर्च करण्याचे आवाहन आहे

**निधीचा उपयोग कशासाठी करणार**

डीपीसीमार्फत विविध यंत्रणाच्या मागणी प्रस्तावानुसार तरतूद केली जाते. यात सुचविलेल्या कामानुसार हा निधी आरोग्य, शिक्षण, क्रीडा, ऊर्जा आदी कामांवर प्राधान्याने खर्च केला जाणार आहे.

**अखेर निधी पूर्णपणे खर्च करण्याचे उद्दिष्ट**

जिल्ह्याचा सन २०२४-२५ या वर्षाचा डीपीसीचा आराखडा ४७४ कोटींचा होता. यापैकी आतापर्यंत ३०५ कोटी रुपयांचा निधी विविध यंत्रणाकडे वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी खर्चाच्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणेकडून नियोजनानुसार प्रक्रिया सुरू आहे. ३१ मार्चपर्यंत शंभर टक्के निधी खर्च करण्यात येईल. त्या दृष्टिकोनातून संबंधित यंत्रणाकडून प्रक्रिया राबविली जात आहे.

# कायद्याचा वापर तलवार म्हणून नाही तर ढाल म्हणून करा : श्रीमती मंगला कांबळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सुरक्षेसाठी अनेक कायदे तयार करण्यात आले आहे. तथापि, महिलांनी कायद्याचा वापर नेहमी ढाल म्हणून करावा, तलवार म्हणून कायद्याचा वापर करू नये असे प्रतिपादन जिल्हा वरिष्ठस्तर न्यायाधीश तथा सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्रीमती मंगला कांबळे यांनी केले तर स्त्री मुक्तीची चळवळ याचा अर्थ पुरूषांविरूध्द चळवळ असा अर्थ कदापी होत नाही तर ती कालबाह्य सामाजिक चालीरीतिंपासून मुक्ती असे प्रतिपादन प्राचार्य श्रीमती ललिता देशमुख यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त महावितरण विभागीय प्रशिक्षण केंद्र अमरावती येथे (दि.११ मार्च) आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहातेअधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार अधीक्षक जिल्हा विधी सेवा

## महावितरण अमरावती परिमंडळात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

प्राधिकरण शालीनी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना श्रीमती कांबळे म्हणाल्या कीआज सती प्रथा, केशवपन यासारख्या गोष्टी नाहीत तरी पण समाजाला प्रबोधनाची गरज आहे केवळ व्यक्तिगत अहंकार दुखावल्यावरून प्रकरण घटस्फोटापर्यंत आणि कोर्टापर्यंत जाते. सामंजस्याने जगायला शिकले पाहिजे वाद होऊ नये याची काळजी महिला व पुरूष या दोघांनीही घेतली पाहिजे.



पाळण्याची दोरी जर महिलांच्या हाती आहे तर आपल्या बाळाला स्त्री पुरुष समानतेचे, चांगल्या संस्काराचे बाळकडूही महिलांनीच दिले पाहिजे.

यावेळी बोलतांना प्राचार्य श्रीमती ललिता देशमुख म्हणाल्या की अनेक सामाजिक बंधने आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही सावित्रीबाईनी महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडली, त्यासाठी स्वतः छळ सहन केला. काळाच्या ओघात आजच्या मुलींना सामाजिक शैक्षणिक आणि सर्वच क्षेत्रामध्ये अनेक सोयी सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत, तथापि, सावित्रीबाईंच्या कष्टाची जाणीव आजच्या मुलींनी ठेवली पाहिजे. मिळालेल्या स्वातंत्र्याचे रूपांतर स्वैराचारात होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच आजच्या काळात आपली विवाह संस्था आणि कुटुंब संस्था टिकवण्यासाठी सामंजस्य दाखवणे गरजेचे आहे.

यावेळी बोलतांना मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी म्हणाले की सध्या महिला सर्वच क्षेत्रांमध्ये आघाडीवर असून महावितरणच्या कामांमध्ये त्या अतिशय उत्तम योगदान देत आहेत.अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार यांनी महिलांनी फिल्डवर काम केले पाहिजे, नोकरीसोबत आरोग्याचीही काळजी घेतली पाहिजे तसेच आर्थिक साक्षर बनून भविष्याची तरतूद केली पाहिजे असे आवाहन केले. उपस्थितांपैकी कनिष्ठ अभियंता प्राजक्ता मुस्कवाड आणि तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या माधूरी वानखडे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधूसुदन मराठे यांनी केले. प्रमुख वक्ते म्हणून आलेल्या पाहुण्यांचा परिचय सहाय्यक विधी अधिकारी आद्यश्री कांबे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहायक अभियंता प्रियंका सोळंके यांनी केले तर आभार व्यवस्थापक (मास) कल्पना भुले यांनी मानले.कार्यक्रमाला वरिष्ठ अधिकाऱ्यांसह परिमंडळात महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.